सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २९९ | मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१


**सोने-चांदी**

**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १४१५०० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १३०२०० |
| १८ सोने ७५.००% | ₹ १०८२०० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २२४०/- |

भाव प्रती १० ग्रॅम



श्री. राजेश बापू पाटील
माजी नगरसेवक



श्री. संजय पाटील
अमळनेर



डॉ. अशोक पाटील
संचालक : कृउबा, अमळनेर



श्री. राहुल इधे
सहाय्यक नियोजन अधिकारी



श्री. मधुसूदन विसावे
पत्रकार



श्री. मनोज पांडव
सुवर्ण व्यावसायिक



श्री. हरिष अहिरराव
जळगाव जनता बँक



श्री. जगदीश बाविस्कर
ग्रामसेवक

# झाडे फक्त लावणार नाही, तर ती जगवून दाखविणार

## जयनील फाऊंडेशनचा अमळनेरमध्ये प्रत्यक्ष कृतीतून हरित संकल्प

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पर्यावरण संवर्धनाचा संदेश केवळ घोषणांपुरता न ठेवता तो प्रत्यक्ष कृतीतून उतरविण्याचा संकल्प जयनील फाऊंडेशनने केला आहे. त्या अनुषंगाने अमळनेर शहरात सोमवार, दि. 20 जुलै रोजी मोठ्या उत्साहात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले.

यंदाच्या पावसाळ्यात शहर अधिक हिरवेगार व्हावे, पर्यावरणाचा समतोल राखला जावा आणि भावी पिढीसाठी स्वच्छ, निरोगी वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने शेकडो वृक्ष लागवडीसह संवर्धनाचा संकल्प फाऊंडेशनने केला आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे 'झाडे लावून विसरणार नाही, तर ती जगवणारच' हा निर्धार करून अनेक ठिकाणी वृक्षारोपण केले जाते; मात्र त्यानंतर झाडांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष होते. ही बाब लक्षात घेऊन जयनील फाऊंडेशनने प्रत्येक लावलेल्या वृक्षांची नियमित देखरेख करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक झाडाला ट्री गार्ड, वेळोवेळी खत, आवश्यकतेनुसार पाणी, तसेच सातत्याने निगा राखून ती झाडे मोठी होईपर्यंत त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी फाऊंडेशन स्वीकारणार आहे.

याबाबत जयनील फाऊंडेशनचे अध्यक्ष गौतम पाटील आणि उपाध्यक्ष वरुण पाटील यांनी सांगितले, की पर्यावरणाचा ऱ्हास थांबवायचा असेल तर केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर प्रत्येक झाड जगले पाहिजे. आमचा भर फक्त लागवडीवर नसून झाडांच्या संगोपनावर आहे. यंदा पावसाळ्यात शहरात जास्तीत जास्त झाडे लावून अमळनेर अधिक हिरवेगार करण्याचा आमचा मानस आहे. प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे आणि त्याच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारावी. प्रत्येक जीवंत झाड हे भविष्यातील पिढीसाठी अमूल्य ठेवा ठरणार आहे.

या उपक्रमावेळी पोलीस उपनिरीक्षक भगवान शिरसाट, चेतन राजपूत, जितेंद्र ठाकूर, नरेंद्र चौधरी, पोलीस शिपाई सुनील पाटील, आरिफ मेवाती, किरण पाटील, दर्शन पाटील, वेद पाटील, टिल्लू पाटील, प्रशांत पाटील, किशोर महाजन, योगेश राजपूत, वरद कासार, अभिषेक भदाणे, मेहुल चौधरी, राहुल पाटील, भूषण पाटील, भूषण लोहार, विशाल पाटील, पीयूष पाटील यांच्यासह जयनील फाऊंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते व पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जयनील फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे शहरवासीयांकडून स्वागत होत असून, 'वृक्षारोपणापेक्षा वृक्षसंवर्धन महत्त्वाचे' हा संदेश देणारा उपक्रम इतर सामाजिक संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.





*अमळनेर : जयनील फाऊंडेशनतर्फे सोमवार, दि. २० जुलै रोजी वृक्ष लागवडीतून हरित अमळनेरचा संकल्प करताना अध्यक्ष गौतम पाटील. शेजारी उपाध्यक्ष वरुण पाटील, चेतन राजपूत, जितेंद्र ठाकूर, योगेश राजपूत, किशोर महाजन, दर्शन पाटील, वेद पाटील, हरिष पठाण, नरू चौधरी आदी. दुसऱ्या छायाचित्रात वृक्ष लागवड करताना पोलीस उपनिरीक्षक भगवान शिरसाट, पोलीस शिपाई सुनील पाटील आदी.*

# इनोमरेशन फॉर्म न भरल्यास मतदारयादीत नाव येणार नाही : प्रांताधिकारी भंगाळे

## युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे प्रभाग क्र. ८ मध्ये एसआयआर नोंदणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्रात मतदारयादीची विशेष आणि सखोल तपासणी मोहीम सुरू आहे. त्यालाच (एसआयआर- स्पेशल इंटेन्सिव्ह रिविजन) असे म्हणतात. प्रक्रियेत मृत, स्थलांतरित किंवा अपात्र मतदारांची नावे वगळली जातात आणि पात्र नव्या मतदारांची नावे समाविष्ट केली जातात. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) घराघरांत जाऊन मतदारांची माहिती आणि कागदपत्रे तपासतात. या कामात नागरिकांना व बीएलओ यांना मदत व्हावी म्हणून येथील युवा कल्याण प्रतिष्ठानने प्रभाग क्र. ८ मध्ये संत सखाराम महाराज नगर ओपन प्लेस व साने गुरुजी जेष्ठ नागरिक संघ रामबाग कॉलनी या दोन केंद्रांवर एसआयआर नोंदणीची व्यवस्था सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत केली होती. प्रभाग क्र. ६,७, ८ यातील प्रत्येक नागरिकांच्या घरी माहितीपत्रक व केंद्रावर उपस्थित राहण्याचे आवाहन युवा कल्याण प्रतिष्ठानने केले होते. या एसआयआर नोंदणी अभियानात सुमारे पाचशे नागरिकांनी इनोमरेशन फॉर्म भरून दिले. त्यामुळे बीएलओ यांनी समाधान व्यक्त केले. एकाच ठिकाणी फॉर्म भरून देण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्याने नागरिकांनीही प्रा. अशोक पवार (अध्यक्ष- युवा कल्याण प्रतिष्ठान) व बीएलओ यांचे आभार मानले.

दरम्यान, अमळनेर प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी वरील दोन्ही केंद्रांना भेट दिली व सुरू असलेल्या कामाबाबत समाधान व्यक्त केले. बीएलओ अजय भामरे, धर्मा धनगर , चिंतामण धनके, शिवाजी मोरे, दत्तू कोळी, विकास पाटील, ज्ञानेश्वर भदाणे, दिनेश साळुंखे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी किरण शिसोदे, अशोक बिऱ्हाडे, पत्रकार संजय पाटील, मुन्ना पवार, मिलिंद मोरे, गोसावी आबा, आनंद पवार, सुनील बाविस्कर आदी उपस्थितांचे सहकार्य लाभले. प्रभाग क्र. ८ च्या नागरिकांसाठी दिनांक २६ जुलै २०२६ रोजी संत सखाराम महाराज नगर ओपन पेस येथे एसआर नोंदणीची सुविधा सकाळी १० ते सायंकाळी ५ उपलब्ध असणार आहे, याची नागरिकांनी नोंद घ्यावी.



*अमळनेर : युवा कल्याण प्रतिष्ठानच्या सहकार्याने राबविलेल्या एसआयआर मोहिमेंतर्गत प्रभाग क्र. ८ मधील नोंदणी केंद्राला भेट देऊन माहिती घेताना प्रांताधिकारी मयूर भंगाळे. शेजारी बीएलओ अजय भामरे, प्रा. अशोक पवार आदी.*

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!



*अमळनेर : येथील पालिकेत लाड-पागे समितीच्या धोरणानुसार प्रलंबित असलेल्या नियुक्ती प्रकरणांवर निर्णयासाठी प्रशासनाकडून जाणूनबुजून टाळाटाळ व कुचराई केली जात आहे, असा आरोप करीत सोमवार, दि. २० जुलै रोजी पालिकेसमोर अखिल महाराष्ट्र सफाईगार व चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष नागेश कंडारे, उमेदवार किरण बैंडवाल, संदीप धाप, नरेंद्र घोगले, बरखा संगेळे आणि सिमरन लोहेरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी सुरू केलेले बेमुदत अन्नत्याग आंदोलन.*

### लाड-पागे समितीच्या प्रलंबित प्रकरणांवरून

# पालिकेसमोर अन्नत्याग आंदोलन सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेत लाड-पागे समितीच्या धोरणानुसार प्रलंबित असलेल्या नियुक्ती प्रकरणांवर निर्णयासाठी प्रशासनाकडून जाणूनबुजून टाळाटाळ व कुचराई केली जात आहे, असा आरोप अखिल महाराष्ट्र सफाईगार व चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष नागेश मोहन कंडारे यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केला आहे. यासंदर्भात श्री. कंडारे यांनी आज सोमवार, दि. २० जुलैपासून पालिकेसमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.

पान २ वर



## संपादकीय



# ९२ लाख 'नकोशां'ची गोष्ट

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या ई-केवायसी पडताळणीनंतर सुमारे ८१ ते ९२ लाख महिला अपात्र ठरून त्यांचे हप्ते रोखल्याची बातमी मुळीच धक्कादायक नाही. उत्पन्न मर्यादा ओलांडणे, ई-केवायसी पूर्ण न करणे आणि करदाते असणे ही यामागची प्रमुख कारणे सांगितली जात असली तरी राज्याच्या तिजोरीतील खडखडाचा आवाज त्याहून मोठा आहे. तब्बल १४ हजार कोटी रुपये या अपात्र लाभार्थींनी लाटले आहेत! महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा नारा देत कार्पोरेट पद्धतीने हजारो महिलांच्या उपस्थितीत दोन वर्षांपूर्वी या योजनेचे ठिकठिकाणी 'लाँच' झाले तेव्हा राज्यात विधानसभा निवडणुका तोंडावर होत्या. त्यामुळे वाऱ्याच्या वेगाने योजनेची अंमलबजावणी झाली. दोन महिन्यांचा एकत्रित हप्ता तातडीने लाभार्थी महिलांच्या बँक खात्यांत जमा करण्यात आला होता. भाजप आणि मित्रपक्षांच्या प्रचारात ही योजना केंद्रबिंदू ठरली. तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गुलाबी जॅकेट चर्चेत आले; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींकडून हातभर राख्या बांधून घेतल्या. अर्ज भरण्याची प्रक्रिया आणि निकष शिथिल करण्यात आले, कसून पडताळणी होत नसल्याने अल्पावधीत कोट्यवधी महिला योजनेत जोडल्या गेल्या, यात नवल नव्हते. मतदानयंत्रावरचे बटन दाबण्यापूर्वीच योजनेचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा झाले होते. दरमहा १५०० रुपये ही आकर्षक रक्कम आणि 'आम्ही बहिणींना आर्थिक ताकद दिली' हा प्रचार अत्यंत प्रभावीपणे राबवला गेला आणि अपेक्षेप्रमाणे राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पदरात मोठे यश टाकले.

दोन कोटी ४० लाख महिलांनी योजनेसाठी नोंदणी केली होती. त्यामुळे राज्याच्या तिजोरीतील मोठा हिस्सा या एकाच योजनेसाठी वर्ग करावा लागला. हजारो कोटी रुपयांचा बोजा सरकारी तिजोरीवर पडला. त्यामुळे पायाभूत सुविधा, रस्ते विकास, सिंचन आणि इतर कल्याणकारी योजनांच्या निधीमध्ये कपात करावी लागली. राज्यावरील कर्जाचा बोजा आधीच वाढत असताना, अशा थेट रोख हस्तांतरण योजनांमुळे आर्थिक ताण आणखी वाढला, यात आश्चर्य नव्हते. 'कॅग'ने आपल्या ताज्या अहवालात यावर बोट ठेवले आहे; सरकारने मंजूर बजेटपेक्षा (२९,६९३ कोटी रुपये) तब्बल ३,५४१ कोटी रुपये अधिक खर्च केले आहेत आणि याचे कोणतेही ठोस कारण दिलेले नाही. 'लाडकी बहीण' योजना महाराष्ट्र शासनाने सुरू केली २८ जून २०२४ या दिवशी. त्याला दोन वर्षे उलटून गेली आहेत. तब्बल २४ महिने निकष धाब्यावर बसवून हजारो-लाखो लोकांनी या योजनेचा गैरफायदा घेतला. अनेक ठिकाणी एकाच घरात एकापेक्षा जास्त महिलांनी अर्ज केले, तर काहींनी कुटुंबाचे उत्पन्न अडीच लाखांहून अधिक असतानाही खोटे उत्पन्नाचे दाखले जोडले. सरकारी नोकरदारांच्या नातेवाइकांनी वाहत्या गंगेत हात धुऊन घेतले. प्राप्तिकर भरणाऱ्यांनीही डल्ला मारला. कहर म्हणजे काही पुरुषांनी बोगस कागदपत्रे तयार करून पैसे लाटले. अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांनी लुबाडलेले सरकारी पैसा परत मिळवण्यासाठी सरकार कायदेशीर पावले उचलणार असले तरी सगळ्या अपात्र लोकांकडून पैसे वसूल करणे अशक्य आहे. यापुढील हप्ते बंद होतील, एवढेच.

जाणीवपूर्वक बनावट कागदपत्रे, खोटे उत्पन्नाचे दाखले किंवा बोगस आधार कार्ड वापरून सरकारची फसवणूक केली त्यांच्यावर कडक कारवाई व्हायलाच हवी; तरच यापुढे अशी लूट रोखता येईल. योजना सुरू करताना घाईगडबडीत यंत्रणेकडून गंभीर चुका झाल्या. लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्यास सांगण्यात आले होते. वारंवार मुदतवाढही देण्यात आली होती; पण मुळातच बोगस असलेल्या लाभार्थींकडून ही पूर्तता होणे अशक्यच होते. सुरुवातीलाच आधार लिंक, प्राप्तिकर माहिती आणि रेशन कार्ड प्रणालीशी अर्ज ताडून पाहिले असते, तर अपात्र अर्जदारांना पहिल्याच टप्प्यात बाद करून सरकारचे कोट्यवधी रुपये वाचले असते. तब्बल दोन वर्षे पैसे वाटायचे आणि नंतर अपात्र लाभार्थी शोधून त्यांच्याकडून वसुली करणार म्हणायचे, यातून मोठा राजकीय फायदा मिळाला; पण प्रशासनाचा दुप्पट वेळ, मनुष्यबळ आणि जनतेचे कोट्यवधी रुपये वाया गेले. या सगळ्यात आर्थिक गरज असलेल्या कितीतरी गरीब आणि गरजू महिला या योजनेपासून वंचित राहिल्या असतील. ' लाडकी बहीण योजना ' महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाची असली, तरी राजकीय घाई आणि नियोजनशून्य अंमलबजावणीमुळे लाडक्या बहिणी आता 'नकोशा' ठरल्या आहेत. सध्या कोणतीही मोठी निवडणूक तोंडावर नाही. त्यामुळे याची जाहीर कबुली देण्यासाठी सरकारने वेळ मात्र अचूक साधली आहे.

# सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला महाराष्ट्र विकास आघाडीचा पाठिंबा

## केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिले प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : 'नीट'सह अन्य पेपरफुटीच्या घटना, परीक्षांमधील कथित गैरव्यवहार, शिक्षणावरील वाढता खर्च आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांसारख्या गंभीर प्रश्नांकडे केंद्र सरकारने लक्ष द्यावे. तसेच या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा द्यावा, या मागणीसह उपोषण करणारे शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्याशी पोलिसांकडून झालेल्या वागणुकीचा निषेध करून संबंधितांवर कारवाई व्हावी, यासाठी येथील अमळनेर तालुका महाराष्ट्र विकास आघाडीतर्फे सोमवार, दि. २० जुलै रोजी प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे, की विविध पेपरफुटीच्या घटना आणि परीक्षांमधील कथित गैरव्यवहाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी दिल्लीतील जंतरमंतर येथे उपोषण करणारे सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी बळजबरीने ताब्यात घेऊन रुग्णालयात दाखल केल्याची घटना लोकशाही मूल्यांना धक्का देणारी आहे. शांततामय मार्गाने आंदोलन करणाऱ्या वांगचुक यांना हटविणे अयोग्य असून, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांबाबत सरकारने गंभीर भूमिका घ्यावी. वांगचुक यांच्या सनदशीर आंदोलनाला अमळनेर तालुका महाराष्ट्र विकास आघाडीचा पाठिंबा आहे.

यावेळी माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, डी. एम. पाटील, बी. के. सूर्यवंशी, धनगर दला पाटील, अरुण देशमुख, संदीप घोरपडे, डॉ. रवींद्र पाटील, शरद पाटील, प्रकाश सोनवणे, शिवदास शेटे, दिलीप वानखेडे, गणेश पवार, अॅड. शिवकुमार ससाणे, वासुदेव पवार, दर्शनाताई पवार, बन्सीलाल भागवत, राजेंद्र पाटील, नितीन निळे, चंद्रशेखर भावसार, मसूद पठाण, आकाश गव्हाणे सुभाष पाटील यांच्यासह महाराष्ट्र विकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



*अमळनेर : 'नीट'सह अन्य पेपरफुटीच्या घटना, परीक्षांमधील कथित गैरव्यवहार, शिक्षणावरील वाढता खर्च आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांसारख्या गंभीर प्रश्नांकडे केंद्र सरकारने लक्ष द्यावे, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पदाचा राजीनामा द्यावा, या मागणीसह उपोषण करणारे शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्याशी पोलिसांकडून झालेल्या वागणुकीचा निषेध करून संबंधितांवर कारवाई व्हावी, यासाठी येथील अमळनेर तालुका महाराष्ट्र विकास आघाडीतर्फे सोमवार, दि. २० जुलै रोजी प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देताना माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, डी. एम. पाटील, बी. के. सूर्यवंशी, धनगर दला पाटील, अरुण देशमुख, संदीप घोरपडे, डॉ. रवींद्र पाटील, शरद पाटील, प्रकाश सोनवणे, शिवदास शेटे, दिलीप वानखेडे, गणेश पवार, अॅड. शिवकुमार ससाणे, वासुदेव पवार, दर्शनाताई पवार, बन्सीलाल भागवत आदी.*



*अमळनेर : येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात आयोजित कार्यक्रमात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करताना माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील. शेजारी शहराध्यक्ष चेतन राजपूत, सोशल मीडिया विभागाचे जिल्हाध्यक्ष सनी गायकवाड, युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष चैतन्य संदानशीव, सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष करण साळुंखे, सोशल मीडिया जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानदीप सांगोरे, विद्यार्थी सहसचिव चेतन बोरसे तसेच योगेश पाटील, प्रीत शाह.*

# राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

## प्रणव चौधरी तालुकाध्यक्ष, मनीष पाटील शहराध्यक्ष तर हूजैफा पठाण कार्याध्यक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीसाठी नव्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये प्रणव चौधरी यांची तालुकाध्यक्षपदी, मनीष पाटील यांची शहराध्यक्षपदी तर हूजैफा पठाण यांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात आयोजित कार्यक्रमात माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने काम करणाऱ्या युवा कार्यकर्त्यांवर पक्षाने विश्वास व्यक्त करीत त्यांच्याकडे महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली.

मागील काही वर्षांपासून हे तिन्ही पदाधिकारी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय व विविध समस्या सोडविण्यासाठी सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांच्या संघटन कौशल्याची, विद्यार्थ्यांमधील संपर्काची आणि पक्षनिष्ठेची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. आगामी काळात विद्यार्थी संघटना अधिक सक्षम करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना प्रभावीपणे न्याय मिळवून देण्यासाठी नवनियुक्त पदाधिकारी कार्य करतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भागवत पाटील, शहराध्यक्ष चेतन राजपूत, सोशल मीडिया विभागाचे जिल्हाध्यक्ष सनी गायकवाड, युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष चैतन्य संदानशीव, सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष करण साळुंखे, सोशल मीडिया जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानदीप सांगोरे, विद्यार्थी सहसचिव चेतन बोरसे तसेच योगेश पाटील, प्रीत शाह यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रभाग क्र. १७ मध्ये 'एसआयआर' मोहीम

## नागरिकांचा मोठा सहभाग; मतदारयादी पडताळणी, आवश्यक दुरुस्तीसाठी अर्ज सादर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रभाग क्र. १७ मधील बूथ क्र. २०० आणि २०२ येथे भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेली 'एसआयआर' (मतदार पुनरीक्षण) मोहिमेंतर्गत कामकाज उत्साहपूर्ण वातावरणात झाले. श्रीकृष्ण मंदिराजवळील पालन हार एंटरप्रायजेसमध्ये आयोजित या मोहिमेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत मतदारयादीतील नावांची पडताळणी, आवश्यक दुरुस्ती तसेच नव्या नोंदणीसाठी अर्ज सादर केले.

प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा हक्क अबाधित राहावा आणि एकही पात्र मतदार मतदार यादीपासून वंचित राहू नये, या उद्देशाने ही विशेष मोहीम राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान मतदारांना आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच नावातील त्रुटी, पत्ता बदल, नव्याने नाव समाविष्ट करणे आदी प्रक्रिया सुलभपणे पूर्ण करण्यात आल्या. या मोहिमेस बूथ क्र. २०२ चे बीएलओ शेख सर तसेच बूथ क्रमांक २०० चे बीएलओ मोरे सर यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. याशिवाय कैलास सोनार, किशोर बारी, प्रकाश सोनार आणि कांबळे यांनी नागरिकांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून देण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमामुळे अनेक नागरिकांची मतदार नोंदणी, नावातील दुरुस्ती तसेच इतर आवश्यक कामे सुलभपणे पूर्ण झाली.

# पालिकेसमोर अन्नत्याग आंदोलन सुरू

पान १ वरून : निवेदनात म्हटले आहे, की आपणास दि. २ जुलै २०२६ रोजी आंदोलनाची सूचना दिली होती. त्यावर आपणाकडून दि. ९ जुलै रोजी उत्तर देण्यात आले. त्यात प्रशासनाने संबंधित प्रकरणे ३० ते ४० वर्षे जुनी असल्याने चौकशी आवश्यक असल्याचे नमूद केले असून, यापूर्वी स्थापन केलेल्या त्रिस्तरीय समितीच्या अहवालाच्या आधारे दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रकरणे निकाली काढल्याचे सांगितले आहे. याबाबत संघटनेचा दावा आहे, की समितीने दर्शविलेल्या त्रुटींची पूर्तता सर्व उमेदवारांनी दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजीच आवश्यक कागदपत्रांसह केली. त्यानंतर जानेवारी २०२६ पासून सातत्याने पाठपुरावा करूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही. मुख्याधिकाऱ्यांनी संबंधित आस्थापना लिपिक व विभागप्रमुखांना एका महिन्यात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, सहा महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. महाराष्ट्र शासनाच्या दि. १३ ऑक्टोबर २०२४ च्या निर्णयानुसार १९७५ पासूनची प्रलंबित प्रकरणे सुधारित धोरणानुसार निकाली काढण्याचे निर्देश असतानाही अमळनेर पालिका प्रशासनाने त्याची अंमलबजावणी केलेली नाही. त्यामुळे सफाई कर्मचारी व अनुसूचित जातीतील पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवले जात आहे. प्रशासनाने तातडीने संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करून प्रलंबित प्रकरणांवर निर्णय घ्यावा. या प्रकरणातील उमेदवारांमध्ये किरण अनिल बैंडवाल, संदीप अर्जुन धाप, नरेंद्र गुरुचरण घोगले, बरखा सुनील संगेळे आणि सिमरन यश लोहेरे यांचा समावेश आहे.

# 'मेघदूत' कालिदासांच्या उत्कट प्रतिभेचा आविष्कार : दिनेश नाईक

## साहित्य भारतीतर्फे महाकवी कालिदास दिनी सावित्रीबाई फुले महाविद्यालयात कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : प्राचीन भारतीय साहित्य परंपरेत संस्कृत भाषेतील साहित्याने मोलाची भर घातली आहे. यात महाकवी कालिदासांचे योगदान मोठे आहे. मेघदूत हे महाकाव्य तर महाकवी कालिदासांच्या उत्कट प्रतिभेचा अविष्कार आहे, असे मत साहित्य भारतीचे जिल्हा कार्याध्यक्ष दिनेश नाईक यांनी व्यक्त केले. येथील सावित्रीबाई फुले महाविद्यालयात महाकवी कालिदास दिनानिमित्त 'महाकवी कालिदास : जीवन व कार्य' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य पी. एम. कोळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. साहित्य भारतीच्या येथील शाखेतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री. नाईक म्हणाले, की कालिदासांनी अतिशय कठोर साधना करून ज्ञान व प्रतिभा प्राप्त केली होती. त्यांच्या साहित्यात निसर्ग, पर्वत, नदी यांचे सौंदर्य, तत्कालीन समाजजीवन, प्रेम, शृंगार, मानवी भावभावना यांचे जीवंत चित्रण आपल्याला वाचायला मिळते. सोपी शब्दरचना, विलक्षण कल्पनाशक्ती यामुळे त्यांच्या साहित्याने वाचकांना भुरळ घातली आहे. जगातील अनेक भाषांमध्ये या साहित्याची भाषांतरे झाली आहेत. दोन महाकाव्य, दोन खंडकाव्य व तीन नाटके अशा सात सुप्रसिद्ध साहित्य संपदेचे निर्माण कालिदासांनी केले.



*अमळनेर : येथील साहित्य भारतीच्या शाखेतर्फे महाकवी कालिदास दिनानिमित्त सावित्रीबाई फुले महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात महाकवी कालिदास व माता सरस्वती यांच्या प्रतिमा पूजनावेळी उपस्थित जिल्हा कार्याध्यक्ष दिनेश नाईक, प्राचार्य कोळी, शाखाध्यक्ष प्रा. नरेंद्र सोनवणे आदी.*

तत्पूर्वी, मान्यवरांच्या हस्ते कालिदासांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाखाध्यक्ष प्रा. नरेंद्र सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य कोळी यांनी अशा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होण्यास मदत होते, असे सांगितले.

कार्यक्रमास साहित्य भारतीचे विवेक जोशी, मंगेश काळकर, सारंग गर्गे, शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनिल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सुनील वाघ यांनी आभार मानले.

# रोटरी क्लबतर्फे भव्य आंतरशालेय चित्रकला स्पर्धा

## चारशेहून अधिक विद्यार्थ्यांनी घडविले कलागुणांचे प्रभावी दर्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील रोटरी क्लबच्या शाखेतर्फे पी. बी. ए. इंग्लिश मीडियम शाळा परिसरातील रोटरी सभागृहात रविवार, दि. १९ जुलै रोजी भव्य आंतरशालेय चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात अमळनेरसह परिसरातील विविध शाळांतील चारशेहून अधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडविले.



*अमळनेर : येथील रोटरी क्लबच्या शाखेतर्फे पी. बी. ए. इंग्लिश मीडियम शाळा परिसरातील रोटरी सभागृहात रविवार, दि. १९ जुलै रोजी भव्य आंतरशालेय चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात सहभागी झालेले अमळनेरसह परिसरातील विविध शाळांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी.*

स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. सुप्रसिद्ध चित्रकार व शिल्पकार प्रल्हाद सोनार (शिरपूर) हे प्रमुख अतिथी होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत चित्रकलेतील सर्जनशीलता, कल्पकता आणि सातत्यपूर्ण सरावाचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांना इयत्तानिहाय विविध विषय देण्यात आले होते. स्पर्धकांनी सामाजिक जाणीव, पर्यावरण, देशप्रेम, निसर्ग तसेच दैनंदिन जीवनाशी संबंधित विषयांवर आकर्षक चित्रे साकारली. परीक्षकांनी चित्रांचे बारकाईने परीक्षण करून उत्कृष्ट कलाकृतींची निवड केली. स्पर्धेच्या नियोजनाची जबाबदारी देवांग शाह व डॉ. शरद बाविस्कर यांनी सांभाळली. दिनेश पालवे यांनी सूत्रसंचालन केले. अध्यक्ष महेश पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे मुलांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळत असल्याचे सांगितले.

कार्यक्रम यशस्वितेसाठी देवांग शाह, महेश पाटील, डॉ. शरद बाविस्कर, कीर्ती कोठारी, पूनम कोचर, रोहित सिंघवी, सनी कोठारी, सचिन कोठावदे, ईश्वर सैनानी, अजय रोडगे, प्रतीक जैन, चेलाराम सैनानी यांच्यासह रोटरी क्लबच्या सदस्यांनी विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. स्पर्धेच्या आयोजनासाठी सेंट मेरी इंग्लिश मीडियम स्कूलचे दिलीप पाटील, स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूलच्या मयुरीताई बनसोडे व प्रियंकाताई परदेशी, न्यू व्हीजन इंग्लिश मीडियम स्कूलच्या गायत्रीताई बारी, अॅड. ललिता पाटील इंटरनॅशनल स्कूलचे गणेश लोहार तसेच डी. आर. कन्या शाळेचे किरण पाठक यांनी विशेष सहकार्य केले. स्पर्धेत सहभागींना सहभाग प्रमाणपत्र व आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. सचिव प्रशांत निकम यांनी सहभागी विद्यार्थी, पालक, शिक्षक व सहकाऱ्यांचे आभार मानले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# कौन हैं आयपीएस अर्चित? जिन्होंने आयआयटी के बाद ₹ ३५ लाख एलपीए जॉब ठुकराकर यूपीएससी को चुना, पुलिसिंग को बना रहे हाईटेक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यूपीएससी की सिविल सेवा परीक्षा और इंजीनियरिंग की आयआयटी-जेईई दुनिया की सबसे कठिन परीक्षाओं में गिनी जाती हैं। महाराष्ट्र नागपुर के रहने वाले अर्चित चंदक ने सबसे टफ माने जाने वाली इन दोनों परीक्षाओं को क्रैक किया है, बल्कि टॉपर्स में से एक थे। विदेशी कंपनी उन्हें लाखों की सैलरी देकर बुला रहा थी, फिर भी उन्होंने यूपीएससी को चुना और आईपीएस बने। आयपीएस अर्चित की सक्सेस स्टोरी सिर्फ एक करियर बदलने की कहानी नहीं, बल्कि अपने सपनों पर अटूट विश्वास और मातृभूमि की सेवा के प्रति समर्पण की एक मिसाल है।

**आयआयटी-जेईई में स्टेट टॉपर थे अर्चित चंदक**

अर्चित चंदक, महाराष्ट्र में नागपुर के साधारण परिवार से आते हैं। बचपन से उन्हें पढ़ने-लिखने का शौक रहा है। बचपन से पढ़ाई में होशियार अर्चित ने बहुत

## सक्सेस स्टोरी

पहले तय कर लिया था कि उन्हें आईआईटी से पढ़ाई करनी है। उन्होंने साल २०१२ में आयआयटी-जेईई एग्जाम दिया और पहले ही प्रयास में पूरे शहर में टॉप किया था। जेईई में अच्छे स्कोर की वजह से आईआईटी दिल्ली में एडमिशन मिला और मैकेनिकल इंजीनियरिंग की बीटेक डिग्री हासिल की।

**विदेशी कंपनी से मिला ₹ ३५ लाख सालाना सैलरी का पैकेज**

आईआईटी दिल्ली से बीटेक डिग्री हासिल करने के बाद, अर्चित को लाखों की सैलरी वाली नौकरी का ऑफर मिला। एक जापानी कंपनी ने उन्हें भारीभरकम ३५ लाख रुपये सालाना सैलरी का जॉब ऑफर दिया। इतनी




बड़ी रकम और विदेशी कंपनी में नौकरी यानी ऐशो-आराम की जिंदगी, जिसे पाने का सपना अधिकतर युवा देखते हैं। लेकिन अर्चित के लिए काफी नहीं था। उनके सपने बड़े थे। उनका सपना सिविल सेवा में जाकर देशसेवा करना था।

**३५ लाख रुपये की नौकरी ठुकराकर यूपीएससी चुना**

उन्होंने ठान लिया कि वे अपनी जिंदगी सिविल सेवा के लिए समर्पित करेंगे। आईआईटी से बीटेक पूरा करने के बाद, अर्चित ने जपानी कंपनी की ओर से मिला ३५ लाख रुपये पैकेज ठुकरा दिया और यूपीएससी को चुना। उन्होंने सिविल सेवा परीक्षा की तैयारी शुरू कर दी। साल २०१८ में अपने पहले अटेम्प्ट में ही देश की दूसरी सबसे कठिन परीक्षाओं में से एक मानी जाने वाली यूपीएससी सिविल सेवा परीक्षा भी क्रैक ली।

**यूपीएससी में १८४वीं रैंक लाकर बने आयपीएस**

ऑल इंडिया रैंक १८४ के साथ भारतीय पुलिस सेवा (आयपीएस) में चयनित हुए। पहली पोस्टिंग भुसावल के बाजारपेठ थाने में थाना प्रभारी (एसएचओ) के रूप में हुई। यहां अपने काम और ईमानदारी से उन्होंने जनता का भरोसा जीता। आगे चलकर वे प्रमोशन पाकर नागपुर में पुलिस उपायुक्त (डीसीपी) बने। थाना प्रभारी (एसएचओ) के पद पर शुरुआत करने वाले अर्चित मई २०२५ से महाराष्ट्र कैडर के अंदर अकोला जिले में एसपी पद का भार संभाल रहे हैं।

**पुलिसिंग को हाईटेक बना रहे आयआयटीएन से आयपीएस बने अर्चित**

एसपी अर्चित चंडक की लीडरशिप में, जिला 'त्रिनेत्र' नाम का एक एआय-बेस्ड प्रेडिक्टिव पुलिसिंग सिस्टम शुरू किया गया। यह सिस्टम कानून लागू करने वाली एजेंसियों के सोचने, प्लान बनाने और काम करने के तरीके को बदल रहा है।

जमीनी हकीकत को ध्यान में रखकर बनाया गया त्रिनेत्र, अपराध से जुड़े अलग-अलग रिकॉर्ड जैसे एफआयआर, एहतियाती कार्रवाई, बीट इंटेलिजेंस और व्यवहार के पैटर्न को एक साथ लाता है और उन्हें तुरंत काम में लाए जा सकने वाले सुझावों में बदल देता है।

**नेक इरादे और खुद पर विश्वास की मिसाल है आयपीएस अर्चित की कहानी**

इस सिस्टम का मुख्य हिस्सा है 'रिपीट ऑफेंडर रिस्क स्कोर'। यह अपराधों के हालिया होने, बार-बार होने और उनकी गंभीरता का आकलन करता है ताकि अधिकारी उभरते खतरों की पहचान जल्दी कर सकें। इसका मकसद सरल लेकिन असरदार है- पुलिसिंग को सिर्फ घटना के बाद की कार्रवाई से हटाकर अपराध रोकने की ओर ले जाना।

अब पेट्रोलिंग 'क्राइम क्लॉक' के हिसाब से होती है, पैटर्न मैचिंग से जांच तेज होती है, और अपराध होने से पहले ही काउंसलिंग, निगरानी और माहौल में सुधार जैसे शुरुआती कदम उठाए जाते हैं। आईपीएस अर्चित चंदक की कहानी साबित करती है कि अगर इरादे नेक हों और खुद पर भरोसा हो तो, दुनिया की कोई भी ताकत आपको अपने लक्ष्य तक पहुंचने से नहीं रोक सकती।



# छत, गॅलरीच्या भिंतीवरील पिंपळाचे झाड काढायचे कसे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घराच्या भितींच्या भेगांमध्ये स्वतःहून उगवणारी झाडं घराचे सौंदर्य तर बिघडवतात तसेच काँक्रीटचेही नुकसान करतात, विशेषतः पिंपळाचे झाड अशी भितींवर उगवलेली दिसतात. याची मजबूत मुळे हळूहळू विटांना फाडून मोठ्या भेगा तयार करतात, ज्यामुळे छत आणि भिंतींमध्ये ओल (सीलन) येऊ लागते. बहुतांश लोक धार्मिक श्रद्धेमुळे या पवित्र झाडाला तोडण्यास किंवा उपटून टाकण्यास कचरतात.

याच मोठ्या संकोचावर मात करण्यासाठी यूट्यूबवर 'सुरेंद्र की दुनिया' नावाने प्रसिद्ध असलेल्या सुरेंद्र यांनी एक सोपा आणि नैसर्गिक मार्ग सांगितला आहे. या उपायाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये तुम्हाला झाड तोडावे लागत नाही, ते आपोआपच वाळून जाते. तसेच, यासाठी कोणत्याही प्रकारच्या केमिकलचा वापर करावा लागत नाही.

**झाडामुळे घराला धोका**

पावसाळ्यात किंवा हवेच्या माध्यमातून पिंपळाच्या बिया अनेकदा घराच्या भिंतींच्या भेगांमध्ये पोहोचतात. सुरूवातीच्या दिवसांत हे झाड खूप लहान दिसते, परंतु याची मुळे अत्यंत वेगाने पसरतात. जर वेळेत याला हटवले नाही, तर ते काँक्रीट आणि विटांना फाडून भिंतीमध्ये मोठ्या भेगा निर्माण करते, ज्यामुळे घर कमकुवत होऊ लागते.

**पिंपल वाळवण्यासाठी मिठाचा वापर**

पिंपळाचे झाड न तोडता वाळवण्याचा सर्वात सोपा आणि घरगुती उपाय म्हणजे साधे पांढरे मीठ. मीठ झाडांच्या पेशींमध्ये असलेली आर्द्रता शोषून घेते आणि त्यांच्या जीवंत राहण्याची - प्रक्रिया रोखते. हा एक असा सोपा उपाय आहे जो तुमच्या स्वयंपाकघरात नेहमी उपलब्ध असतो आणि यासाठी तुम्हाला कोणतेही महागडे केमिकल खरेदी करण्याची गरज पडत नाही.

**झाडाचे मूळ थोडे खडबडीत करणे**

हा उपाय प्रभावी ठरण्यासाठी सर्वप्रथम पिंपळाच्या झाडाच्या मुळाभोवतीचा भाग थोडा खडबडीत (खुरचून) करून घ्या. असे केल्याने मिठाचा प्रभाव थेट झाडाच्या मुख्य मुळांपर्यंत पोहोचेल. लक्षात ठेवा की तुम्हाला झाड पूर्णपणे तोडायचे किंवा उपटायचे नाही, फक्त त्याच्या मुळाजवळील भाग हलकासा साफ आणि खडबडीत करायचा आहे.

**मिठाच्या पाण्याचे द्रावण तयार करणे**

यूट्यूबर सुरेंद्र यांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही झाडाच्या मुळामध्ये सुके मीठ देखील टाकू शकता. - परंतु जर तुम्हाला झाड लवकर आणि पूर्णपणे वाळवायचे असेल, तर मिठाचे द्रावण (घोल) करून टाकणे हा सर्वात उत्तम मार्ग आहे. यासाठी एका कप पाण्यात २ ते ३ चमचे मीठ मिसळून एक घट्ट द्रावण तयार करा. हे द्रव स्वरूपात असल्यामुळे मुळांच्या खोलवर सहज पोहोचते.

**मुळामध्ये मिठाचे द्रावण टाकण्याची योग्य पद्धत**

आता हे तयार केलेले मिठाचे पाणी पिंपळाच्या झाडाच्या खडबडीत केलेल्या मुळावर व्यवस्थित टाका. मीठ थेट मुळाच्या मुख्य भागावर पडेल याची काळजी घ्या, जेणेकरून मूळ ते शोषून घेईल. मीठ टाकल्यानंतर काही दिवस त्या जागेवर साधे पाणी टाकू नका, अन्यथा मीठ वाहून जाईल आणि त्याचा प्रभाव कमी होईल.

**न तोडता आपोआप वाळेल झाड**

ही सोपी प्रक्रिया केल्यानंतर तुम्हाला काहीही करण्याची गरज नाही. मिठाच्या प्रभावामुळे पिंपळाचे झाड हळूहळू आपली आर्द्रता गमावू लागेल आणि काही दिवसांत पूर्णपणे वाळून जाईल. झाड पूर्णपणे वाळल्यानंतर तुम्ही ते तिथून सहज काढू शकता. या पद्धतीमुळे कोणत्याही धार्मिक संकोचाशिवाय आणि भिंतीला हानी न पोहोचवता तुमच्या समस्येचे निवारण होईल.

# इंद्रायणी की कोलम राईस? रोजच्या आहारासाठी कोणता तांदूळ ठरेल बेस्ट?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तांदळाची निवड करताना तुमची पचनशक्ती, जीवनशैली आणि आरोग्याच्या गरजा लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

**इंद्रायणी तांदळाचे फायदे**

इंद्रायणी तांदूळ सुगंधी, मऊ आणि ऊर्जादायी असून लहान मुले व जास्त शारीरिक श्रम करणाऱ्यांसाठी चांगला पर्याय आहे.

**इंद्रायणीचे मर्यादित सेवन करा**

हा तांदूळ पचायला थोडा जड असल्याने अपचन किंवा गॅसचा त्रास असणाऱ्यांनी प्रमाणातच खावा.

**कोलम राईसचे फायदे**

कोलम तांदूळ हलका, सुटा आणि सहज पचणारा असल्याने रोजच्या आहारासाठी उत्तम मानला जातो.

**कोणासाठी अधिक योग्य?**

पचनाच्या तक्रारी, मधुमेह किंवा हलका आहार घेणाऱ्यांसाठी कोलम राईस अधिक फायदेशीर ठरू शकतो.

**आरोग्यदायी पर्याय कोणते?**

अधिक फायबर आणि पोषणासाठी ब्राऊन राईस किंवा ब्लॅक राईसचाही आहारात समावेश करू शकता.

**संतुलित आहार हाच सर्वोत्तम पर्याय**

कोणताही तांदूळ योग्य प्रमाणात, भाज्या, डाळी आणि प्रथिनयुक्त पदार्थांसोबत खाल्ल्यास अधिक आरोग्यदायी ठरतो.

# पावसाळ्यात अळूची भाजी का खावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अळूच्या पानांमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. यामुळे या भाजीचा आहारात समावेश केल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते.

**पचनक्रिया :** अळूचे अनेक आरोग्यदायी फायदे असून याचा आहारात समावेश केल्याने पचनक्रिया सुधारण्यास मदत होऊ शकते.

**कोलेस्ट्रॉल :** अळूच्या पानांत पोषक तत्वे अधिक असून, त्यात चरबीचे प्रमाण कमी असते. त्यामध्ये फायबर असल्याने कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते.

**वजन :** अळूची पाने वजन नियंत्रणात



ठेवण्यास मदत करू शकतात, त्यात प्रथिनाचे प्रमाण अधिक आणि चरबीचे प्रमाण कमी असते. यामुळे वजन कमी करण्यासाठी आहारात या भाजीचा समावेश करू शकता.

**हाडे :** अळूच्या पानांमध्ये कॅल्शियम आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असल्याने हाडे मजबूत होण्यास मदत होऊ शकते.

**त्वचा :** अळूची पानांची भाजी खाल्ल्याने त्वचा उजळण्यासाठी मदत होते. त्यात अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी असते, ज्यामुळे त्वचा आणि केस निरोगी राहू शकतात.

**रक्तदाब :** अळूच्या पानांमध्ये ओमेगा-३ सह काही फॅटी ॲसिड असतात, हे घटक हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त असून रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते.

**काय काळजी घ्यावी? :** अळूची पाने कधीही कच्ची खाण्याचा प्रयत्न करू नये. कारण त्यामुळे आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. अळूची पाने उकडून अथवा पूर्ण शिजवून खाल्ली जातात.

# 'व्हाईट हाऊस'पेक्षाही महागडा मेस्सीचा डावा पाय!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मेस्सी पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. आता ही चर्चा त्याच्या जादुई डाव्या पायाच्या अद्भुत किमतीची आहे. विविध आंतरराष्ट्रीय अहवालांनुसार मेस्सीच्या डाव्या पायाचा तब्बल ७५० दशलक्ष युरो म्हणजेच सुमारे ९०० दशलक्ष डॉलर्सचा विमा काढण्यात आला आहे. भारतीय चलनात ही रक्कम तब्बल ६,९०० ते ७,५०० कोटी रुपयांच्या घरात जाते. क्रीडा क्षेत्राच्या इतिहासात कोणत्याही खेळाडूच्या शरीराच्या भागासाठी काढण्यात आलेली ही आजवरची सर्वांत मोठी आणि महागडी विमा पॉलिसी आहे.




**जगातील सर्वात महागडी पेंटिंग, लक्झरी जहाजेही पडली मागे**

मेस्सीच्या या डाव्या पायाची किंमत जगातील अनेक ऐतिहासिक वास्तू आणि लक्झरी मालमत्तांपेक्षाही कितीतरी पटीने जास्त आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निवासस्थान असलेले 'व्हाईट हाऊस' (किंमत सुमारे ४,००० ते ५,००० कोटी रुपये) आणि दुबईचे प्रसिद्ध 'बुर्ज अल अरब' (बांधकाम खर्च सुमारे ५,५०० कोटी रुपये) या दोन्ही वास्तू मेस्सीच्या पायाच्या विम्याच्या रक्कमेसमोर फिक्या पडतात. एवढेच नव्हे तर, जगातील सर्वात महागडी पेंटिंग 'साल्व्हाटोर मुंडी' (सुमारे ३,८०० कोटी रुपये) आणि जगातील सर्वात महागडी ट्रान्स्फर फी (नेमारची २०१७ मधील सुमारे २,००० कोटी रुपयांची ट्रान्स्फर) यांच्यापेक्षा मेस्सीचा डावा पाय अधिक मौल्यवान ठरतो आहे.

**डावा पायच ठरणार अर्जेंटिनाचे सर्वात मोठे शस्त्र?**

आठ वेळा बॅलन डी'ओर पुरस्कार जिंकणाऱ्या मेस्सीने आपल्या कारकिर्दीत ८०० हून अधिक गोल केले असून, त्यातील बहुतांश गोल याच डाव्या पायाच्या जादूने झाले आहेत. बार्सिलोना, पीएसजी, इंटर मियामी आणि अर्जेंटिनासाठी खेळताना त्याने याच पायाच्या जोरावर ऐतिहासिक विजेतपदे मिळवून दिली आहेत. आता इतिहास रचण्यासाठी मेस्सीचा हाच 'लाखो डॉलर्सचा डावा पाय' अर्जेंटिनाचे सर्वात मोठे शस्त्र ठरणार आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# हनुमानजींच्या पूजेवेळी ऋणमोचन स्तोत्र पठण का करावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंगळवार हा दिवस हनुमानजींना अत्यंत प्रिय मानला जातो. या दिवशी हनुमानजींची विशेष पूजा केली जाते. तसेच मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून अनेकजण मंगळवारचे व्रत पाळतात. हे व्रत केल्याने साधकाला प्रत्येक कार्यात यश मिळते आणि अडलेली कामे पूर्ण होतात. ज्योतिषशास्त्रानुसारही शुभ कार्यांमध्ये यश मिळविण्यासाठी हनुमानजींची उपासना करण्याचा सल्ला दिला जातो. हनुमानजींची पूजा केल्याने कुंडलीतील अशुभ ग्रहांचा प्रभाव कमी होतो आणि जीवनात मंगलमय वातावरण निर्माण होते.

जर तुम्हालाही आर्थिक अडचणींसह जीवनातील विविध संकटांपासून मुक्ती हवी असेल, तर मंगळवारी स्नान करून विधीपूर्वक हनुमानजींची पूजा करा. या वेळी ऋणमोचन स्तोत्राचे पठण करा. अशी धार्मिक मान्यता आहे की या स्तोत्राच्या पठणाने धनसंबंधित अडचणी दूर होण्यास मदत होते.

### स्तोत्राचे लाभ

या स्तोत्राचे श्रद्धेने पठण केल्याने हनुमानजींची कृपा प्राप्त होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. त्यांच्या कृपेने साधकाला विविध प्रकारची सुखे लाभतात आणि आर्थिक अडचणी कमी होण्यास मदत होते, असे मानले जाते. सनातन धर्मग्रंथांनुसार हनुमानजींच्या नामस्मरणाने शारीरिक व मानसिक त्रासांपासूनही दिलासा मिळतो, अशी श्रद्धा आहे.




### मूलमंत्र

अङ्गारक महीपुत्र भगवन् भक्तवत्सल ।
नमस्तेऽस्तु महाभाग ऋणमाशु विनाशय ॥

### अर्घ्य

भूमिपुत्र महातेजः स्वेदोद्भव पिनाकिनः ।
ऋणार्थस्त्वां प्रपन्नोऽस्मि गृहाणार्घ्यं नमोऽस्तु ते ॥

### ऋणमोचन अङ्गारक स्तोत्रम्

रक्तमाल्याम्बरधरः शूलशक्तिगदाधरः ।
चतुर्भुजो मेषगतो वरदश्च धरासुतः ॥
मङ्गलो भूमिपुत्रश्च ऋणहर्ता धनप्रदः ।
स्थिरासनो महाकायो सर्वकामफलप्रदः ॥
लोहितो लोहिताक्षश्च सामगानां कृपाकरः ।
धरात्मजः कुजो भौमो भूमिदो भूमिनन्दनः ॥
अङ्गारको यमश्चैव सर्वरोगापहारकः ।
सृष्टेः कर्ता च हर्ता च सर्वदेशैश्च पूजितः ॥
एतानि कुजनामानि नित्यं यः प्रयतः पठेत्।
ऋणं न जायते तस्य श्रियं प्राप्नोत्यसंशयः ॥
अङ्गारक महीपुत्र भगवन् भक्तवत्सल ।
नमोऽस्तु ते ममाशेषं ऋणमाशु विनाशय ॥
रक्तगन्धैश्च पुष्पैश्च धूपदीपैर्गुडोदनैः ।
मङ्गलं पूजयित्वा तु मङ्गलाहनि सर्वदा ॥
एकविंशति नामानि पठित्वा तु तदन्तिके ।
ऋणरेखा प्रकर्तव्या अङ्गारेण तदग्रतः ॥
ताश्च प्रमार्जयेन्नित्यं वामपादेन संस्मरन् ।
एवं कृते न सन्देहः ऋणान्मुक्तः सुखी भवेत् ॥
महतीं श्रियमाप्नोति धनदेन समो भवेत् ।
भूमिं च लभते विद्वान् पुत्रानायुश्च विन्दति ॥



# मंगळवारी कर्जाची देवाणघेवाण का करू नये? जाणून घ्या यामागचे कारण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्म आणि ज्योतिषशास्त्रानुसार आठवड्यातील प्रत्येक दिवस एखाद्या देवतेला किंवा ग्रहाला समर्पित असतो. प्रत्येक दिवसाचे स्वतःचे वेगळे धार्मिक आणि ज्योतिषीय महत्त्व आहे. मंगळवार हा दिवस विशेषतः भगवान हनुमानदी आणि श्री मंगळग्रह देवांना समर्पित मानला जातो. धार्मिक श्रद्धा आणि ज्योतिषीय मान्यतेनुसार मंगळवारी कर्ज घेणे किंवा देणे शुभ मानले जात नाही.

### मंगळवारी कर्जाची देवाणघेवाण का टाळावी?

मंगळवारचा थेट संबंध मंगळग्रहाशी आहे. ज्योतिषशास्त्रात मंगळ हा उग्र स्वभावाचा ग्रह मानला जातो. तो धैर्य, पराक्रम आणि ऊर्जेचे प्रतीक आहे. त्याचबरोबर मंगळ ग्रहाला कर्जमुक्ती देणारा ग्रहही मानले जाते.

ज्योतिषशास्त्रानुसार मंगळवारी घेतलेले कर्ज 'अग्नीसारखे' असते, म्हणजे ते लवकर वाढते आणि त्याची परतफेड करणे कठीण होते. अशी श्रद्धा आहे की या दिवशी कर्ज घेतल्यास व्यक्ती कर्जाच्या चक्रात अडकू शकते आणि कर्जाचा भार वाढत जाऊ शकतो. त्यामुळे कर्जमुक्तीची इच्छा असल्यास मंगळवारी कर्जाची देवाणघेवाण टाळावी, असे सांगितले जाते.

### धार्मिक श्रद्धा

मंगळवार हा संकटमोचक भगवान हनुमानजी यांना समर्पित दिवस मानला जातो. या दिवशी हनुमानजींची पूजा करणे, त्यांना शेंदूर अर्पण करणे आणि सुंदरकांडाचे पठण करणे अत्यंत शुभ मानले जाते. अशी श्रद्धा आहे की या उपायांमुळे विविध संकटे आणि आर्थिक अडचणी दूर होण्यास मदत होते. तसेच मंगळवारी नवीन कर्ज घेणे टाळावे आणि कर्जमुक्तीसाठी हनुमानजींची भक्तिभावाने उपासना करावी, अशी धार्मिक मान्यता आहे.

### कर्जफेडीसाठी शुभ दिवस

मंगळवारी नवीन कर्ज घेणे टाळावे, अशी श्रद्धा असली तरी कर्जाची परतफेड सुरू करण्यासाठी किंवा पहिला हप्ता भरण्यासाठी हा दिवस शुभ मानला जातो. जर तुम्ही जुन्या कर्जाची परतफेड सुरू करणार असाल, तर मंगळवारी पहिला हप्ता भरल्यास कर्जातून लवकर मुक्ती मिळते, अशी धार्मिक मान्यता आहे.

# भूमिपुत्र श्री मंगळदेवांच्या कृपेसाठी मंगळवारचे व्रत कसे करावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्योतिषशास्त्रात भूमिपुत्र श्री मंगळग्रह देवांना विशेष महत्त्व दिले जाते. मंगळ हे मेष आणि वृश्चिक या राशींचे स्वामी मानले जातात. ज्यांच्या जन्मकुंडलीत श्री मंगळग्रह बलवान असून शुभ फल देत असतात, ती व्यक्ती धाडसी, निर्भय आणि नेतृत्वगुणांनी संपन्न असते. अशा व्यक्तींना पोलिस, लष्कर, प्रशासन यांसारख्या क्षेत्रांत यश मिळण्याची शक्यता अधिक असते. तसेच त्यांना जमीन, घर, वाहन आणि लहान भाऊ-बहिणींचे सुख लाभते. याउलट मंगळग्रह अशुभ स्थितीत असल्यास याबाबतीत अडचणी किंवा प्रतिकूल परिणाम जाणवू शकतात.

ज्योतिषशास्त्रानुसार श्री मंगळग्रह देवांची कृपा मिळविण्यासाठी आणि त्यांना बळकट करण्यासाठी मंगळवारचे व्रत अत्यंत शुभ आणि फलदायी मानले जाते. जर तुम्हालाही तुमच्या कुंडलीतील श्री मंगळग्रह मजबूत करायचा असेल, तर मंगळवारचे व्रत योग्य पद्धतीने आणि नियमांचे पालन करून करणे महत्त्वाचे आहे.

### मंगळवारचे व्रत कधी सुरू करावे?

हिंदू धर्मपरंपरेनुसार कोणत्याही महिन्याच्या शुक्ल पक्षातील पहिल्या मंगळवारी हे व्रत सुरू करता येते. मात्र ज्येष्ठ महिन्यातील मोठा मंगळवार (बडा मंगळ) या व्रताच्या प्रारंभासाठी अत्यंत शुभ मानला जातो. याशिवाय अगहन (मार्गशीर्ष) किंवा वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षात, शुभ मुहूर्त पाहूनही या व्रताची सुरूवात करता येते.

### मंगळवार व्रताची पूजाविधी

मंगळवारी सकाळी लवकर उठून स्नान करावे आणि शक्य असल्यास लाल रंगाचे वस्त्र परिधान करावे. यानंतर आपल्या क्षमतेनुसार ठराविक संख्येने मंगळवारचे व्रत करण्याचा संकल्प करावा. त्यानंतर मंदिरात किंवा घराच्या ईशान्य दिशेला, पूर्व किंवा उत्तराभिमुख बसून लाल रंगाच्या आसनावर स्थान घ्यावे. एका पाटावर किंवा चौकीवर लाल वस्त्र अंथरून त्यावर मंगळदेवांची मूर्ती किंवा प्रतिमा स्थापित करावी. त्यानंतर लाल फुले, रोळी (कुंकू), चंदन, धूप, दीप, नारळ आणि मिठाई अर्पण करून श्रद्धाभावाने मंगळवार व्रताची कथा ऐकावी किंवा वाचावी. पूजेदरम्यान मंगळदेवांच्या खालीलपैकी कोणत्याही एका मंत्राचा किमान १०८ वेळा जप करावा.

ॐ अं अंगारकाय नमः
ॐ क्रां क्रीं क्रौं सः भौमाय नमः

व्रत करणाऱ्या व्यक्तीने दिवसभरात एकदाच गव्हाच्या चुरम्याचे सेवन करावे. ठरवलेल्या संख्येचे सर्व मंगळवार पूर्ण झाल्यानंतर विधीपूर्वक हवन, पूजा आणि उद्यापन करावे.



### मंगळवार व्रताचे नियम

- ▲ शक्य असल्यास व्रताच्या दिवशी लाल रंगाचे वस्त्र परिधान करावे.
- ▲ धार्मिक मान्यतेनुसार हे व्रत किमान २१ किंवा ४५ मंगळवार करावे.
- ▲ व्रताच्या दिवशी शरीर आणि मनाची शुद्धता राखावी.
- ▲ या दिवशी ब्रह्मचर्याचे पालन करावे आणि विषयभोगांपासून दूर राहावे.
- ▲ मंगळदेवांसोबत भगवान हनुमानांचीही पूजा करावी.
- ▲ व्रताच्या दिवशी मीठाचे सेवन टाळावे. दिवसभरात एकदाच गोड पदार्थांचे भोजन करावे. जसे की दूध, गोड पोळी किंवा खीर यांचे सेवन करावे.
- ▲ व्रत करणाऱ्या व्यक्तीने राग टाळावा आणि या दिवशी केस, नखे इत्यादी कापू नयेत, अशी धार्मिक मान्यता आहे.

# संकटावर मात करण्यासाठी मंगळवारचे व्रत लाभदायक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंगळवार हा भगवान हनुमानजी यांच्या उपासनेसाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. धार्मिक श्रद्धेनुसार या दिवशी बजरंगबलींची भक्तिभावाने पूजा केल्यास सुख-समृद्धीची प्राप्ती होते आणि जीवनातील अनेक संकटांपासून मुक्ती मिळते.

पंचांगानुसार आठवड्यातील प्रत्येक दिवस एखाद्या देवतेला समर्पित असतो. त्याप्रमाणे मंगळवार हा प्रभू श्रीरामचंद्रांचे परमभक्त भगवान हनुमानजी यांना समर्पित दिवस मानला जातो. अशी श्रद्धा आहे की सर्व प्रकारच्या संकटांपासून मुक्ती मिळविण्यासाठी मंगळवारचे व्रत करणे लाभदायक ठरते. हे व्रत बल, धैर्य, पराक्रम आणि मान-सन्मान वाढवणारे मानले जाते. तसेच या व्रतामुळे नकारात्मक शक्तींचा प्रभाव दूर होतो, अशी धार्मिक मान्यता आहे.

### मंगळवार हनुमानजींचा दिवस का मानला जातो?

स्कंद पुराणानुसार मंगळवारी पवनपुत्र भगवान हनुमानजी यांचा जन्म झाला होता. त्यामुळे या दिवशी त्यांची पूजा केल्यास विशेष पुण्यफळ प्राप्त होते आणि विविध संकटांपासून संरक्षण मिळते, अशी श्रद्धा आहे.

ज्योतिषशास्त्रानुसार मंगळवारचा संबंध मंगळग्रह देवांशी आहे. त्यामुळे जन्मकुंडलीतील श्री मंगळग्रह बळकट करण्यासाठी हनुमानजींची पूजा आणि उपासना करावी, असा सल्ला दिला जातो.

### मंगळवारचे व्रत कधी सुरू करावे?

जर तुम्हाला मंगळवारचे व्रत सुरू करायचे असेल, तर कोणत्याही महिन्याच्या शुक्ल पक्षातील पहिल्या मंगळवारी हे व्रत सुरू करू शकता. त्या दिवशी आपल्या मनोकामनेचा संकल्प करून व्रताची सुरूवात करावी. त्याचवेळी सलग २१ किंवा ४५ मंगळवार व्रत पाळण्याचा संकल्प करावा. संकल्प पूर्ण झाल्यानंतर व्रताचे उद्यापन करावे.

### मंगळवार व्रताची पूजाविधी

जर तुम्ही २१ किंवा ४५ मंगळवारांचे व्रत करण्याचा संकल्प केला असेल, तर तो पूर्ण करणे आवश्यक मानले जाते. मंगळवारी सकाळी लवकर उठून स्नान करून नित्यकर्म आटोपावीत. त्यानंतर घराच्या ईशान्य (उत्तर-पूर्व) दिशेतील जागा स्वच्छ करून तेथे एका चौकीवर भगवान हनुमानजी यांची मूर्ती किंवा चित्र स्थापित करावे. इच्छित असल्यास पूजाघरातच असलेल्या हनुमानजींच्या प्रतिमेची पूजा करू शकता. त्यानंतर भगवान हनुमानजींना लाल रंगाचे वस्त्र अर्पण करावे. हातात पाणी घेऊन व्रताचा संकल्प करावा. त्यानंतर लाल फुले, फुलांची माळ आणि शेंदूर अर्पण करावा.


नैवेद्य म्हणून बुंदीचे लाडू किंवा भाजलेले हरभरे आणि गूळ अर्पण करू शकता. त्यानंतर जल अर्पण करून धूप आणि तुपाचा दिवा लावावा. दिवा प्रज्वलित केल्यानंतर सुंदरकांड आणि हनुमान चालीसा यांचे पठण करावे. पठण पूर्ण झाल्यावर हनुमानजींची आरती करून पूजा संपवावी. शेवटी पूजा करताना झालेल्या चुका किंवा त्रुटींसाठी क्षमा मागावी. यानंतर दिवसभर उपवास करावा. सूर्यास्तापूर्वी पुन्हा हनुमानजींची आरती करून प्रसाद ग्रहण करावा आणि त्यानंतर व्रत सोडून भोजन करावे.



### मंगळवार व्रताचे उद्यापन

सलग २१ किंवा ४५ मंगळवारांचे व्रत पूर्ण झाल्यानंतर अनुक्रमे २२ व्या किंवा ४६ व्या मंगळवारी व्रताचे उद्यापन करावे. या दिवशी भगवान हनुमानजींना चोळा अर्पण करावा. तसेच २१ ब्राह्मणांना भोजन घालून आपल्या सामर्थ्यानुसार दान-दक्षिणा द्यावी. जर २१ ब्राह्मण उपलब्ध नसतील, तर १, ५ किंवा शक्य तितक्या ब्राह्मणांना भोजन घालूनही उद्यापन करता येते.

# पार्थिव गणपती पूजन केव्हा केले जाते?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चातुर्मासाची सुरूवात आषाढी एकादशीपासून सुरू होते. यानंतर व्रत-वैकल्यांचा राजा मानला गेलेला श्रावण महिना सुरू होतो. श्रीकृष्ण जयंती म्हणजेच गोकुळाष्टमी झाल्यानंतर सर्वांनाच वेध लागतात ते लाडक्या गणपती बाप्पांच्या आगमनाचे. भाद्रपद महिन्यातील चतुर्थीला पार्थिव गणेश पूजन केले जाते. एका मान्यतेनुसार श्रीगणेशांच्या अवतारांपैकी गणेश यांचा जन्म भाद्रपद शुद्ध चतुर्थीला झाला. महादेव शिवशंकरांनी कैलास पर्वतावर भाद्रपद शुद्ध चतुर्थीला याच दिवशी जन्मोत्सव साजरा केला होता. असे काही दाखले पुराणांमध्ये आढळतात. गणेशांसंदर्भात अनेक पौराणिक कथा दिसून येतात.

भगवान शिव आणि विष्णूंचे अवतार झाले, त्याचप्रमाणे गणेशांचेही अनेक अवतार झाले आहेत. प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार घेणारे गणपती हे आदिदेव आहेत. सुमुख, एकदंत, कपिल, गजकर्णक, लंबोदर, विकट, विघ्ननाशक, विनायक, धूम्रकेतू, गणाध्यक्ष, भालचंद्र आणि गजानन, अशी गणेशांची प्रमुख नावे असल्याचे सांगितले जाते. या प्रत्येक नावाच्या मागे एक आख्यायिका आहे.

### महाभारत लेखक गणपती

महाभारताची रचना महर्षी व्यासांनी केली, हे आपल्या सर्वांना माहिती आहे. मात्र, महर्षी व्यासांनी महादेव आणि पार्वती देवींचे पुत्र गणपतींकडून लिहून घेतले. घराघरांत पार्थिव पूजनाची सुरूवात तेव्हापासून झाली, असे सांगितले जाते. महाभारताची रचना करताना महर्षी व्यास आणि गणपती यांनी एकमेकांना काही अटी घातल्या होत्या. गणपतींना आपल्या लेखनाच्या गतीबाबत आत्मविश्वास होता. गणपती महर्षी व्यासांना म्हणाले, की तुम्ही महाभारत कथा हळूहळू सांगणार असाल, तर मला कंटाळा येईल. त्यामुळे तुम्ही न थांबता सलग गोष्ट सांगावी. ही अट आपणास मान्य असेल, तर आणि तरच लेखनाची जबाबदारी मान्य करेन.

### महाभारत लेखनाचा श्रीगणेशा

व्यास महर्षी होते. गणपतींच्या अटीवर त्यांनी केवळ स्मित हास्य केले. महर्षी व्यास गणपतींना म्हणाले, की आपली अट मला मान्य आहे. मात्र, मी सांगितलेल्या वाक्याचा अर्थ समजला, उमगला, तरच ते वाक्य लिहून पूर्ण करायचे. अन्यथा अर्थ समजेपर्यंत थांबायचे, अशी अट महर्षी व्यासांनी ठेवली. गणपती तयार झाले आणि त्यांनी महाभारत लेखनाचा श्रीगणेशा केला. महर्षी व्यास नेमके काय सांगताहेत हे समजून घ्यायला अनेकदा गणपतींना विलंब व्हायला लागला. संपूर्ण महाभारत कथा समजून लिहून घेण्यासाठी तब्बल तीन वर्षांचा कालावधी लोटला, असे सांगितले जाते.

### घरोघरी पार्थिव गणपती पूजन

महाभारत कथा पूर्ण होण्यात मोठा कालावधी लोटला. कित्येक दिवस एकाच ठिकाणी बसल्यामुळे गणपतींचे शरीर आखडून गेले. गणपतींच्या शरीरातील उष्णताही वाढायला लागली. वाढत जाणाऱ्या उष्णतेवर उपाय म्हणून गणपतींच्या सर्वांगावर मातीचा लेप लावण्यात आला. हा लेप लावून लावून जाडसर झाला. त्याला टणकपणा येऊन त्याने गणरायांच्या मूर्तीचा आकार घेतला. महाभारताची कथा लिहून पूर्ण झाल्यानंतर ही माती झटकून विसर्जित करण्यात आली. तेव्हापासून महाभारताचा लेखक म्हणून गणपतींचा सन्मान करण्यासाठी गणपतींची मातीची मूर्ती घडवून तिचे पूजन करण्याची परंपरा सुरू झाली, अशी एक कथा सांगितली जाते.

### महाभारतकालीन गणपती अवतार

गणेशांनी सत्ययुग, त्रेतायुग आणि द्वापारयुगात अवतार घेतल्याचे सांगितले जाते. गणेशांनी सतयुगात कश्यप आणि अदितीकडे महोत्कट विनायकांचा अवतार धारण केला. या युगात गणपतींनी देवतान्तक आणि नरान्तक नावाच्या राक्षसांचा वध करून धर्माची स्थापना केली आणि आपल्या अवतारकार्याची सांगता केली. गणेशजी त्रेतायुगात मोरावर आरूढ होऊन प्रगट झाले. तर द्वापारयुगात गणेशजी उंदरावर बसून प्रगट झाले. गणेशांना पौराणिक पत्रकार किंवा लेखक असेही संबोधले जाते. कारण याच युगातील अवतारात त्यांनी महाभारत लिहिले होते, असे सांगितले जाते.

### पेशवे आणि घरगुती गणेशोत्सव

सवाई माधवरावांनी घरगुती गणेश पूजनाला उत्सवाचे मोठे रूप दिले. हा उत्सव भव्य स्वरूपात शनिवारवाड्यातील गणेश महालात भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून ते दशमीपर्यंत साजरा केला जाऊ लागला. दरबारातील अन्य मानकऱ्यांनीसुद्धा या कल्पनेचे स्वागत केले. शनिवारवाड्यातून फुला-पानांनी सजवलेल्या पालखीतून गणेशमूर्तींची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात येऊ लागली. शनिवारवाड्याजवळच उत्तरेच्या दिशेला असणाऱ्या नदीप्रवाहात गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात येऊ लागले. सुरूवातीला दीड दिवस, पाच दिवस, दहा दिवस असा उत्सव होता. आजच्या काळातही ही वाटचाल सुरू असल्याचे दिसून येते. लोकमान्य टिळकांच्या देशकार्यात गणपतींना देश-परदेशात महत्त्व प्राप्त झाले.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)